| | | | |
|---|---|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख<br>प्रकरण नोंदणी तारीख<br>प्रकरण निकाल तारीख | :<br>:<br>: | २४/०६/२०२४<br>२४/०६/२०२४<br>०७/०८/२०२६ |
| MHDH030023062024 | निकालाचा कालावधी | : | ०२ वर्षे ०१ म. १४ दिवस |

**<u>मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे यांचे न्यायालयात,</u>**

**(पिठासीन अधिकारी:– श्री. के.बी.चौगुले)**

**<u>न्यायनिर्णय</u>**

(घोषित दिनांक ०७ ऑगस्ट, २०२६)

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ३८५/२०२४</u>**
निशाणी क्रमांक– २०/ब
गु.र.क्र. २५६/२०२४
धुळे शहर पोलीस स्टेशन, धुळे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | : | **महाराष्ट्र शासन,**<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>धुळे शहर पोलीस ठाणे, धुळे. |
| तर्फे | : | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम.बागले,** |
| आरोपी | : | **शुभम यशवंत बागुल,**<br>वयः– १९ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>राहणारः– मिलींद सोसायटी, साक्री रोड, धुळे. |
| तर्फे | : | **विधिज्ञ श्री. ए.एस.बडगुजर,** |

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची दिनांक | : | ३१/०५/२०२४ |
| प्रथम खबर दिनांक | : | ०१/०६/२०२४ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याची दिनांक | : | २४/०६/२०२४ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | २६/०९/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | १७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | : | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०७/०८/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास, त्याची दिनांक | : | --- |

**आरोपीचा तपशीलः–**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर मुक्तता केल्याची तारीख | गुन्ह्याची कलमे | आरोपीस शिक्षा करण्यात आली किंवा निर्दोष ठरवण्यात आले | देण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता संपरीक्षेदरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | शुभम यशवंत बागुल, | फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस दिली. | २३/०७/२०२५ | भा.दं.वि. कलम ३२४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | –– | –– |

**न्यायनिर्णय**

(घोषीत दिनांक:– ०७ ऑगस्ट, २०२६)

सदर प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे. (यापुढे भारतीय दंड संहिता, १८६० चा उल्लेख संक्षीप्त स्वरुपात **'भा.दं.वि.'** असा करण्यात येईल.)

**अभियोगपक्षाच्या खटल्याची तथ्ये संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे:–**

**०२.** फिर्यादी सौ. शिला अशोक लोंढे यांनी दिनांक ०१/०६/२०२४ रोजी धुळे शहर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली की, त्या त्यांच्या परिवारासह मिलींद सोसायटी, साक्री रोड, धुळे येथे राहण्यास असून त्यांचे पती मजुरीकाम करुन परिवाराचा उदरनिर्वाह करतात. दिनांक ३१/०५/२०२४ रोजी त्यांच्या घराजवळ राहणारे श्री. नंदु पांडुरंग लोंढे यांच्या मुलीचे लग्न असल्याने त्याठिकाणी फिर्यादी तिची नातेवाईक शोभाबाई प्रविण लोंढे यांच्यासह लग्नाची गाणी म्हणण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी फिर्यादीचा पुतण्या सचिन लोंढे हा देखील आलेला होता. दिनांक ३१/०५/२०२४ रोजी रात्री ११:०० वाजेच्या सुमारास फिर्यादीच्या शेजारी राहणारा मुलगा शुभम यशवंत बागुल हा तेथे आला व सचिन लोंढे यास शिवीगाळ करुन झटापट करु लागला. त्यावेळी फिर्यादी व तिची नातेवाईक शोभाबाई लोंढे यांनी सदरची झटापट थांबविली व शुभम हा त्याच्या घरी निघून गेला.

त्यानंतर थोड्या वेळाने शुभम हा पुन्हा सचिन याच्याजवळ आला व त्यास शिवीगाळ करु लागला. त्यावेळी फिर्यादी व तिची नातेवाईक शोभाबाई यांनी शुभम यास शिवीगाळ

करण्याचा जाब विचारला असता शुभम याने फिर्यादी व तिची नातेवाईक शोभाबाई यांना देखील वाईट–वाईट शिवीगाळ करुन, 'तुम्हाला मी पाहून घेईल' अशी धमकी दिली व त्याच्या हातातील काहीतरी तिक्ष्ण हत्याराने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या करंगळीजवळील बोटास तसेच तिची नातेवाईक शोभाबाई हिच्या डोक्यास मारुन त्यांना दुखापत करुन तेथून पळून गेला. त्यानंतर फिर्यादीच्या डाव्या हाताच्या करंगळीजवळील बोटातून रक्तस्त्राव तसेच शोभाबाई यांच्या डोक्यातून रक्तस्त्राव होवू लागल्याने फिर्यादीच्या पतीने तिला उपचारासाठी हिरे वैद्यकीय महाविद्यालय, धुळे येथे तसेच शोभाबाई यांना त्यांचे पती प्रविण लोंढे यांनी उपचारासाठी जुने सिव्हील हॉस्पीटल, धुळे येथे दाखल केले. त्याठिकाणी उपचार झाल्यानंतर फिर्यादीने घडलेल्या घटनेची पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन आरोपीविरुध्द धुळे शहर पोलीस स्टेशन, धुळे येथे गुन्हा नोंद क्रमांक २५६/२०२४, भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तत्कालीन पोलीस नाईक श्री. व्ही.बी.वाडीले यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ नुसार दोषारोप (निशाणी ६) ठेवला. तो दोषारोप आरोपीला त्याच्या मातृभाषेमध्ये वाचुन दाखविण्यात आला असता त्याने त्याच्यावरील आरोप नाकारले व संपरिक्षेची मागणी केली. सदरहु प्रकरणात आरोपीविरुध्द सबळ पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये निवेदन वगळण्यात आल्याबाबतचा निशाणी १ खाली आदेश पारीत केला.

**०४.** याठिकाणी हे स्पष्ट करणे गरजेचे आहे की, आरोपीविरुध्द वरील कलम लावण्यात आले होते. परंतु आरोपी व फिर्यादी यांच्यात न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाल्यामुळे निशाणी १२ वरील आदेशान्वये आरोपीची भा.दं.वि. कलम ५०४ व ५०६ मधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२०(८) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली. म्हणून भा.दं.वि. कलम ३२४ करीता आरोपीविरुध्द खटला चालविण्यात आला.

**०५.** उपलब्ध पुरावा, आरोपीचा बचाव व दोन्ही पक्षांतर्फे सादर केलेला युक्तीवाद लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ३१/०५/२०२४ रोजी रात्री ११:०० वाजेच्या सुमारास, मिलींद सोसायटी, धुळे येथे फिर्यादीच्या राहत्या घराजवळ रस्त्यावर सार्वजनिक जागी आरोपीने त्याच्या हातातील चाकुने फिर्यादी यांच्या डाव्या हाताच्या करंगळी जवळील बोटास व त्याचप्रमाणे साक्षीदार नामे शोभाबाई लोंढे यांच्या डोक्यास चाकुने मारुन त्यांना इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबत:–**

**०६.** प्रचलित प्रक्रिया व पध्दतीनुसार आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप हे संशयापलीकडे जावून सिध्द करण्याची जबाबदारी ही कायद्याने अभियोगपक्षावर टाकलेली आहे. त्याबाबत अभियोगपक्षाने आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी शिला अशोक लोंढे (अ.सा.क्र.१) व जखमी/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नामे शोभा प्रविण लोंढे (अ.सा.क्र.२) यांना तपासलेले आहे.

**०७.** फिर्यादी शिला लोंढे (अ.सा.क्र.१) यांच्या साक्षीपुराव्यात असे आले आहे की, दिनांक ३१/०५/२०२४ रोजी त्यांचा आरोपीसोबत केवळ किरकोळ वाद झाला होता व त्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही घटना घडली नसल्याचे त्यांनी सांगितले. सदरहू साक्षीदारास त्यांनी दिलेली फिर्याद वाचून दाखविली असता त्यात नमुद केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली

नसल्याचे त्यांनी सांगितले. सदरहू महत्वपूर्ण साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत न करता फितूर होणे पसंत केल्याने भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये अभियोगपक्षास सदरील साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची मुभा देण्यात आली होती. परंतु तरी देखील अभियोगपक्षास सदरील साक्षीदाराच्या तोंडून कोणतीही महत्वपूर्ण कबुली वदवता आली नाही. उलट त्यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात त्यांच्यात व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याची बाब मान्य केली आहे. शोभा लोंढे (अ.सा.क्र.२) ह्या जखमी/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्या देखील फितूर झाल्यामुळे त्यांची साक्ष सुध्दा अभियोगपक्षास सहाय्यक ठरु शकेल अशा स्वरुपाची नाही.

**०८.** प्रस्तुत खटल्यात मुळ फिर्यादी यांनी स्वतः अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिली नसून त्यांनी तसेच जखमी/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी देखील त्यांच्यात व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याची बाब त्यांनी मान्य केली आहे. त्यामुळे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात कोणताही हेतू साध्य होणार नसल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सबब अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा पाहता तो पुरावा आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होण्यास पुरेसा नसल्यामुळे मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत:–**

**०९.** वरील मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष पाहता आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. प्रकरण आपसात तडजोड झाले असल्यामुळे फौ.प्र.सं. कलम ४३७–अ ची पूर्तता करण्याची आवश्यकता नाही. सबब, मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेः–

## – आदेश –

१) आरोपीची भा.दं.वि. कलम ३२४ अन्वयेच्या गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल (मु.र.नं. ५८/२०२४) हा मुल्यहिन दर्शविण्यात आला असून तो या न्यायालयात जमा नाही. सबब पोलीस स्टेशन अधिकारी, धुळे शहर पोलीस स्टेशन यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी सदरहू जप्त मुद्देमालाची अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नियमानुसार विल्हेवाट लावावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

KUBER BAPUSO CHOUGULE
Digitally signed by KUBER BAPUSO CHOUGULE
Date: 2026.08.07 17:31:52 +0530

ठिकाणः– धुळे
दिनांक:– ०७/०८/२०२६

(के. बी. चौगुले)
मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे

## अभियोग पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ– अभियोगपक्षाचे साक्षीदारः–

| साक्षीदार क्र. | निशाणी क्रमांक | साक्षीदारांचे नाव | साक्षीदारांचे वर्णन/स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | १४ | शिला अशोक लोंढे, | फिर्यादी |
| २. | १६ | शोभा प्रविण लोंढे, | जखमी/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

### ब– बचावपक्षाचे साक्षीदारः–

| साक्षीदार क्र. | निशाणी क्रमांक | साक्षीदारांचे नाव | साक्षीदारांचे वर्णन/स्वरुप |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

### क– न्यायालयीन साक्षीदारः–

| साक्षीदार क्र. | निशाणी क्रमांक | साक्षीदारांचे नाव | साक्षीदारांचे वर्णन/स्वरुप |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

## अभियोग पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या

### अ– अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्र. | दस्तऐवजाचा तपशील |
|---|---|---|
| १. | १५ | फिर्यादवरील स्वाक्षरी. |

### ब– बचावपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्र. | दस्तऐवजाचा तपशील |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### क– न्यायालयीन दस्तऐवजः–

| अ.क्र. | निशाणी क्र. | दस्तऐवजाचा तपशील |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### ड– जप्त मुद्देमालः–

| अ.क्र. | निशाणी क्र. | दस्तऐवजाचा तपशील |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव (प्रभारी) | : | अ. स. पुराणिक, |
| न्यायालयाचे नांव | : | मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, धुळे. |
| पीडीएफ फाईल अपलोड | : | ०७/०८/२०२६. |

सही/–
लघुलेखक (श्रेणी–२)